FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

पहिली खबर

0167732

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station लाप्रवि, पहिली खबर क्र. FIR No. ०५, वर्ष Year २०२०, दिन क्र. Date २१/०९/२०२०
2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधिनियम १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ...................., कलमे Sections ....................
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ....................
3. (a) अपराधाची घटना : वार रविवार, तारीख पासून १९/९/२०२०, वेळ १७:३०, तारीख पर्यंत २०/९/२०२०, वेळ १५:३०
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   ✓(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date १९/९/२०२०, वेळ Time १७:३०
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०४/२०२०, तारीख Date २१/९/२०२०, वेळ Time ०४:०० वा.
4. माहितीचा प्रकार Type of Information : समक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ११ किमी उत्तर दिशेस, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ....................
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S., Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name महाराष्ट्र अग्निशमन प्रशिक्षण केंद्राजवळ आर टी ओ मार्ग वडाळा टी.टी., ठिकाणाचे नंबर No. if any ........, गल्ली Ward ........, रस्त्याचे नाव Name of road पोलीस स्टेशन रस्ता
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post वडाळा, तालुका Taluka मुंबई, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री. राजा नाइकर (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name श्री. वेणू नाइकर
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ४१ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality ........ फोन नं. Phone No. ९३२४११६२४३
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation दुचाकी मॅकेनिक व रुम दलाली
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........ जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : डी-२, गल्ली / सर्व्हे नं. Ward ........ घर / नाव नं. House/Name No. रुम नं. १६ फोन / मो. नं. Phone/Mo. No. ........ पॅन नं. PAN No. ........ वोटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road सायन कोळीवाडा, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place म्हाडा ट्रान्झीट कॅम्प, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. वडाळा
   तालुका Taluka मुंबई ३७, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र, सध्याचा पत्ता Present Address ........
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

चंद्रकांत जबरदस्त जाधव, वय ५७ वर्षे, नोकरी- पोलीस निरीक्षक वडाळा ट्रक टर्मिनल पोलीस ठाणे, मुंबई रा.ठि.- पोलीस अधिकारी वसाहत, बिल्डिंग नं. २/१२ पहिला मजला, गं.द. आंबेकर मार्ग, नायगाव, मुंबई-१४ मो.नं. ९८२१६२८४०६ ९०८२७८८५८७

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 828

Scanned with CamScanner

यातील फिर्यादी श्री. राजा वेणू नाइकर, वय ४१ वर्षे, व्यवसाय - दुचाकी मॅकेनिक व रूम खरेदी विक्रि दलाली, रा. ठि. - डी-२, रूम नं. १६, सायन कोळीवाडा, म्हाडा ट्रान्सीट कॅम्प, कोकरी आगर, वडाळा, मुंबई ३७ यांचा दि. २०/१/२०२० रोजीचा मराठीत टंकलिखित केलेली फिर्यादी जबाब हीच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात आली असून सोबत जोडण्यात आली आहे.

समक्ष

V.RADA

21-01-2020.

विनोद पाटील
पोलीस निरीक्षक
ला-प्र- विभाग, मुंबई

Scanned with CamScanner

दिनांक :– २१/०१/२०२०

फिर्याद

श्री. राजा वेणु नाइकर, वय ४१ वर्षे, धंदा – दुचाकी मोटार मॅकेनिक व रूम खरेदी–विक्रीची दलाली, रा.ठी. डी–२ ब्लॉक,रूम नंबर १६, म्हाडा ट्रान्झीट कॅम्प, न्यु ९० फिट रोड, वडाळा ट्रक टर्मीनल, मुंबई –४०० ००३७, मो. नं.९३२४११६२४३, आधार कार्ड नं. ३८४६१२२३३४३९.

मी वरीलप्रमाणे असुन जन्मापासुन वरील पत्त्यावर कुटुंबासह राहत आहे असुन न्यु ९० फिट रोडवरील राजा मॅकेनिक गॅरेज असुन त्यामध्ये दुचाकी मोटाराची दुरूस्ती तसेच रूमच्या दलालीमध्ये मिळणाऱ्या उत्पन्नावर माझ्या कुटुंबियाचे पालनपोषण करीत आहे.

माझ्यावर वडाळा टी.टी. पोलीस ठाणे येथे केसेस असुन त्यामध्ये मला शिक्षा देखील झाली आहे. दि.१३/०१/२०२० रोजी दुपारी राजा गॅरेज मध्ये माझी पत्नी सौ. जानकी नाइकर हिचे व बाजुला असणाऱ्या चहा विक्रेत्या तमिल बाईसोबत भांडण झाले.त्यावेळी मी माझे गॅरेजवर होतो. काहीवेळाने मी व माझी पत्नी तसेच ती तामील बाई आम्ही आपआपल्या घरी निघुन गेलो. दि. १४/०१/२०२० रोजी मला वडाळा टि.टि.पोलीस ठाण्यामधील बिट मार्शल असलेले पोलीस कर्मचारी यांनी माझ्या घरी येवुन पोलीस उपनिरीक्षक श्रीमती गौरी थोरवत मॅडम यांच्या समक्ष हजर राहण्यास सांगितले व नमुद बिट मार्शल यांचे मोटार सायकलवर पोलीस ठाणेस जाण्यास निघालो असता वाटेत माझे मालकीच्या राजा गॅरेजच्या बाजुस असलेले तामील बाईचे चहाचे दुकान तुटलेले असल्याचे दिसुन आले. सदरवेळी बिट मार्शल याने मला ते दुकान मीच तोडले आहे का? असे विचारत होते. त्यानंतर बिट मार्शल सोबत पोलीस ठाणेस पोहचलो असता ठाणे अंमलदार म्हणुन ठाणे अंमलदार कक्षात पोलीस उप निरीक्षक श्रीमती गौरी थोरवत यांचे समोर गेलो असता, माझे विरूध्द पोलीस ठाणेस चहाचे दुकान तोडल्याबाबत तक्रार आहे असे सांगुन मला लॉकपमध्ये टाकण्यास सांगितले. परंतु सदरचे चहाचे दुकान मी तोडले नसल्याचे सांगितले. सदर ठिकाणी तक्रार देण्यास आलेली चहाचे दुकान मालकीन तमील बाई (नाव माहीत नाही) हिची पोलीस निरीक्षक जाधव यांनी ठाणे अंमलदार पोउनि गौरी थोरवत यांच्या मदतीने माझे विरूध्द खोटी केस केली.

दिनांक १८/०१/२०२० रोजी पोउनि श्रीमती गौरी मॅडमने माझी पत्नीस फोन करून मला पोलीस ठाणेस येण्याबाबत निरोप दिला असता मी लगेच त्याच दिवशी वडाळा टी.टी. पोलीस ठाणेस जावुन श्रीमती गौरी मॅडमला भेटलो असता मॅडमने मला जाधव साहेबांनी पुर्ण रात्र बसवुन ठेवण्यास सांगितले आहे असे सांगितले असता मी श्रीमती गौरी मॅडम यांना विनंती करून रविवार दिनांक १९/०१/२०२० रोजी सकाळी जाधव साहेब यांची डयुटी असल्याने रविवारी येतो असे सांगितले असता श्रीमती गौरी मॅडम यांनी घरी जावु दिले. त्यानंतर मी दिनांक १९/०१/२०२० रोजी सुमारे १२:३० वा.च्या सुमारास गेलो असता पोलीस निरीक्षक जावध साहेब यांनी बोलाविल्या नुसार त्यांचे कार्यालयात गेलो असता त्यांनी मला शिवीगाळ केली व मी काळे धंदे करून खुप पैसे कमवतो व त्यांना काहीच देत नाही असे बोलले. व माझेवर दिनांक १४/०१/२०२० रोजी बनविलेली खोटी केस प्रमाणे अजुन खोटया केसेस माझे विरूध्द करून मला तडीपार व एम.पी.डी.ए. करून मला बरबाद करून टाकेल अशी धमकी दिली व असे होवु दयायचे नसेल तर त्याकरीता त्यांनी माझेकडे रू. १ लाखाची लाचेची मागणी केली. परंतु माझेकडे जाधव साहेब यांना देण्याकरीता इतके पैसे नसल्याने मी त्यांना विनंती केली व पैसे थोडे कमी करण्यास सांगितले असता त्यांनी मला पुन्हा शिवीगाळ करून खोटया केसेस करण्याची धमकी दिली. मला खुप भिती वाटली मी गेल्या सहा महीन्यापुर्विच नाशीक जेल मधुन बाहेर आलो होतो व पुन्हा जेल मध्ये जाण्यास भिती वाटते. जाधव साहेबांनी माझेकडे रू.८०हजार मागीतले. मी विनंती केली असता त्यांनी रू.७०हजार देण्याचे सांगितले असता मी थोडे थोडे करून देतो असे सांगितले. त्यांनतर मी व जाधव साहेब पोलीस ठाणेच्या बाहेर आलो व माझा मोबाईल बंद असल्याने संपर्क कसा साधु असे मला विचारले असता मी त्यास माझा

VPatil

( विनोद पाटील )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

V.RAJA
21-01-2020

Scanned with CamScanner

फिर्यादि श्री.राजा वेणु नाइकर यांचा दि.२०/०१/२०२० ची फिर्याद

मित्र नामे स्मित अनिल चिंदलकर हा माझे सोबत आलेला होता तो पोलीस ठाणेच्या बाहेर उभा होता त्यांचा मोबाईल कमांक दिला.

घरी आल्यानंतर मी पैशाची जुळवा जुळवी करीत होतो परंतु पैशाची व्यवस्था झाली नाही म्हणुन मी दुपारी सुमारे १४:३० वा. पोलीस निरीक्षक जाधव यांचेशी मोबाईलवर संपर्क साधला असता त्यांनी ते संध्याकाळी ७ वाजता कर्तव्यावरून घरी जाणार असल्याचे सांगुन त्यापुर्वि पैसे घेवुन येण्यास सांगितले व पैस आणले नाहीतर स्टाफ ला माझे घरी पाठवुन उचलुन आण्याची धमकी दिली मी खुप घाबरलेलो होतो. काय करावे ते सुचेनासे झाले. मला पोलीस निरीक्षरक जाधव यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी माझा मित्र स्मित चिंदलकर याचे सोबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे आलो असता तेथील कर्तव्यावरील अधिकारी यांना भेटलो असता त्यांनी माझे कडे विचारपुस करून रविवारी दिनांक १९/०१/२०२० रोजी सापळा अधिकारी असलेले पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांना संपर्क साधुन कार्यालयास येण्याचे सांगितले असता ते काही वेळाने कार्यालयात आले. त्यानंतर त्यांची माझेसोबत ओळख करून दिली असता मी त्यांना घडलेली हकीकत सांगितली. सदरवेळी सपोआ श्री. चौधरी हे देखील आलेले होते व ते पर्यवेक्षक अधिकारी असल्याचे सांगुन माझे सोबत ओळख करून दिली. त्यानंतर मी पोलीस निरीक्षक पाटील व सपोआ श्री. चौधरी साहेब असे पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांचे दुस—या मजल्यावरील कार्यासन कमांक २२१ मध्ये गेलो असता सदर ठिकाणी माझेकडे झालेल्या प्रकाराची माहीती घेतली. त्यांनतर पोलीस निरीक्षक पाटील यांनी दोन शासकिय पंचांना कार्यालयात बोलावुन मला लेखी तक्रार देण्याचे सांगितले असता मला लिहता व वाचता येत नसल्याने माझा मित्र स्मित चिंदलकर याने माझे वतीने माझा तक्रार अर्ज लिहुन दिला त्यावर पोलीस निरीक्षक पाटील यांनी व दोन पंचांनी सहया केल्या. व पोलीस निरीक्षक जाधव यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम खरोखर मागणी केली आहे का? याबाबत खात्री करण्याचे ठरवुन त्याच दिवशी दिनांक १९/०१/२०२० रोजी संध्याकाळी १९:५०वा वडाळा टी.टी.पोलीस ठाणे येथे पडताळणी करण्याकरीता जाण्याचे ठरले व मी पोलीस निरीक्षक पाटील, सपोआ चौधरी, दोन पंच व सापळा पथक असे शासकीय वाहनाने मुकुंदराव आंबेडकर रोड वरील इंडीयन ऑईल पेटोल पंप च्या विरूध्द दिशेने शासकीय वाहन उभे केले.

सदर वेळी पोलीस निरीक्षक पाटील यांनी पडताळणी बाबत योग्य त्या सुचना दिल्या व मला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच कमांक १ यांचे सह पोलीस ठाणेस पोलीस निरीक्षक जावध यांना भेटण्याकरीता गेलो असता पोलीस निरीक्षक जाधव यांना मी माझेकडे त्यांनी मागणी केलेले रू. ७० हजार ची व्यवस्था झाली नसल्याचे सांगितले असता माझेकडे रू. १० हजारच उपलब्ध असल्याचे सांगितले असता त्यांनी ठिक आहे असे सांगुन खिश्यात किती आहेत ते दे व बाकीचे घरी जावुन घेवुन येण्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच पोलीस वाहनाजवळ आलो. सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक पाटील पंच यांनी पोलीस निरीक्षक जावध व माझेमध्ये झालेले संभाषण रेकॉर्ड झालेले व्हाईस रेकॉर्ड ऐकुन त्यात पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझे कडे पैशाची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने सापळा कारवाईचे नियोजन करण्याचे ठरले.

पोलीस निरीक्षक पाटील यांनी सापळा पथकास योग्य त्या सुचना केल्या व मला देखील सुचना देवुन पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझेकडुन मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारल्यास डावा हात वर करून इशारा देण्याचे सांगितले व त्याप्रमाणे रू. १० हजार च्या भारतीय चलनी नोटांना अॅन्थ्रासिड पॉवडर लावले व व्हाईस रेकॉर्ड माझे बनियानला टांगुन पंचासह पोलीस निरीक्षक जाधव यांना लाचेची रक्कम जावुन देण्याचे ठरले. तत्पुर्वि पोलीस निरीक्षक जाधव यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क साधला असता, ते माझी वाट पाहुन घरी निघुन गेल्याचे सांगितले व मला दिनांक २०/०१/२०२० रोजी पोलीस ठाणेस येण्याच सांगितले असता ते नमुद दिवशी पुन्हा पोलीस ठाणेस

V. Patil

V-RAJA
21-01-2020

( विनोद पाटील )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

Scanned with CamScanner

FORM-

फिर्यादि श्री.राजा वेणु नाइकर यांचा दि.२०/०१/२०२० ची फिर्याद

येणार नाही याची खात्री झाल्याने पोलीस निरीक्षक पाटील यांनी सापळा काढुन घेवुन तश्या सापळा पथकास सुचना देवुन दिनांक २०/०१/२०२० रोजी पुन्हा सापळा कारवाईचे आयोजन करणार असल्याचे सांगितले. त्यांनतर वरळी कार्यालयास पंचासह जावुन पंचनामा करण्यात आला.

दिनांक २०/०१/२०२० रोजी मी पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांना मोबाईलवर संपर्क साधुन पोलीस निरीक्षक जाधव हे पोलीस ठाणेस कर्तव्यावर असल्याचे सांगितले असता पो.नि.पाटील यांनी ते सापळा कारवाई करीता येत असल्याचे सांगुन मला वडाळा टि. टि. मोनोरेल स्टेशनजवळ थांबण्याचे सांगितले असता पो.नि.पाटील व सापळा पथक पंचासह नमुद ठिकाणी दुपारी १४:४५ वा. आले व नमुद ठिकाणी सापळा कारवाईकरीता माझे व पंचाचे वक्तव्य घेवुन सापळा पथकास सापळा बाबत सुचना देवुन पोलीस निरीक्षक जाधव यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क साधण्याचे पोलीस निरीक्षक पाटील यांनी सांगितले असता मी माझे मोबाईलवरून संपर्क साधला असता पोलीस निरीक्षक जावध यांनी पाच मिनीटात पोलीस ठाणेस येण्याचे सांगितले नमुद संभाषण पंचा समक्ष व्हाईस रेकॉर्डर मधील मायक्रो एस.डी.कार्ड मध्ये रेकॉर्ड केले होते. त्यांनतर मी पंच व सापळा पथक असे सरकारी वाहनाने वडाळा टी.टी.पोलीस ठाणेजवळ जावुन थांबुन मी व पंच क्रमांक १ असे पोलीस निरीक्षक जाधव यांना भेटण्याकरीता गेलो असता, त्यांनी मला पोलीस ठाणेच्या समोरील रस्त्यावर थोडे पुढे घेवुन जावुन पैसे आणले का असे विचारले असता मी होकार दिला व मी त्यांना रू. १० हजार दिले असता त्यांनी स्विकारल्या नंतर सापळा पथकातील पोलीसांनी पोलीस निरीक्षक जाधव यांना रंगेहात पकडले.

माझे पोलीस निरीक्षक जाधव यांचे सोबत कोणतेही पुर्ववैमन्यस्य नसुन कोणताही आर्थिक व्यवहार नाही.

तरी वडाळा टी.टी.पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रकात जाधव यांनी माझे विरूध्द तडीपार व एम.पी.डी.ए.ची कारवाई न करण्याचे बदल्यात माझेकडुन रू. ७० हजार लाचेची मागणी करून त्यातील रू. १० हजार लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडले म्हणुन माझी त्यांचे विरूध्द कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीत टंकलीखीत केला असुन तो मला वाचुन हिन्दीतुन समजावुन सांगितला असता तो मी सांगितल्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

VPatil

( विनोद पाटील )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

V. RAJA
21-01-2020

Scanned with CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील लोकसेवक आरोपी यांनी फिर्यादी यांचे विरूद्ध वडाळा टी टी पोलीस ठाणे येथे दाखल गुन्ह्यावरून तडीपार व एमपीडीए कारवाई न करण्याकरिता फिर्यादी यांचेकडे रू. ७०000/- लाचेची रक्कमेची मागणी करून त्यातील रू. १0000/- लाचेची रक्कम स्वताच्या फायद्या साठी स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणून यातील आलोसे यांचे विरूद्ध कलम ७ भा. भ्र. प्र. अधि. १९८८ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

विनोद पाटील, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........
District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

V. RAJA

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रमारी अधिकाऱ्याची सही
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name विनोद पाटील
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. लाप्रावि, मुंबई
Posting
Code No. of I. O. ........

1. न्यायालयास सादर केल्याची तारीख........
1. Date and time of submitted to the Court.

2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

nent to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner